MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

महापारेषण समाचार

वर्ष : १४ अंक : ५ पाने : ८ ऑगस्ट-सप्टेंबर २०२०
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

कोरोना विषाणू संसर्गाच्या विरोधात संपूर्ण जग लढा देत असताना महाराष्ट्र राज्याचा वीजपुरवठा अखंड व अविरत चालू ठेवण्याकरिता महापारेषण कंपनीला दिलेली जबाबदारी आपण सर्व अतिशय काटेकोर पध्दतीने पार पाडण्यात यशस्वी ठरलो. निसर्ग चक्रीवादळामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी व पारेषण प्रणाली पूर्ववत करण्यासाठी आपले अभियंते व कर्मचारी यांची कामगिरी वाखाणण्यासारखी

- **अखंड वीजपुरवठा ठेवा**
- **वीजप्रणाली सुरक्षित ठेवा**
- **दैनंदिन कामाच्या नोंदी ठेवा**
- **उच्चप्रतीची उत्पादकता ठेवा**

होती. सर्व आव्हानांवर मात करत आज या महामारीमुळे देशातील बहुतांश कारभार घरातून काम करणाऱ्या (Work from Home) पध्दतीवर विसंबून असताना विजेची अखंड उपलब्धता ही अतिशय महत्त्वाची बाब आपण सांभाळत आहोत.

विजेच्या उपलब्धतेमधील जी साखळी आहे, त्यामध्ये उपकेंद्र वाहिनीवर काम करणारा यंत्रचालक व तंत्रज्ञापासून ते त्यावर काम व देखरेख करणारे अभियंते व अधिकारी समाविष्ट असतात. यामध्ये प्रत्येकाची भूमिका व जबाबदारी महत्त्वाची ठरते. कुठेही आपण आपल्या जबाबदारीत कमी पडलो तर त्याचा दूरगामी परिणाम पारेषण प्रणालीवर पडू शकतो. यासाठी प्रत्येकाने ठरवून व नेमून दिलेली कामे नित्यनेमाने पार पाडणे आवश्यक असते. त्याचबरोबर केलेल्या कामाच्या नोंदी आपल्या कार्यपुस्तिकेत सुध्दा करणे गरजेचे असते. अनेक लहान-सहान गोष्टींचे वेळापत्रक पाळणे गरजेचे असते. या वेळापत्रकामुळे यंत्रणा सक्षम व सुसज्ज ठेवण्यास मदत होते. अशा प्रकारच्या कार्यपध्दतीमुळे अचानक उदभवणाऱ्या संकटास तोंड देता येते. तसेच आपले कार्यक्षेत्र स्वच्छ व सुंदर राहण्यास मदत होते. त्यामुळे कार्यक्षमता व उत्पादकता वाढण्यास मदत होते.

पाश्चात्य देशातील उपकेंद्र व वाहिनी पाहण्यासारखी असतात. त्यामध्ये TQM/ ISO/5'S'/Kaizen या प्रकारच्या कार्यपध्दतीचा अवलंब केल्यामुळे त्यांची कार्यक्षमता उच्चप्रतीची राहते. आपण आपले उपकेंद्र व वाहिनी याची कार्यक्षमता वाढविण्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

आपले कार्यक्षेत्र आदर्श कार्यक्षेत्र ठरलं पाहिजे. त्याकरिता दैनंदिन बाबींची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. आपण काही वेळा दैनंदिनीमध्ये हलगर्जीपणा करतो. त्यामध्ये कार्यालयीन शिस्त बिघडते. बिघडलेल्या व चुकीच्या कार्यपध्दतीमुळे फक्त कार्यक्षमता कमी होत नाही तर त्यामुळे अपघातही घडू शकतात. कार्यक्षमता कमी होण्याचे परिणाम म्हणजे उपकेंद्रामध्ये बिघाड होणे, वाहिनी बंद पडणे. त्यामुळे पारेषण प्रणालीमध्ये बिघाड होतो. हे बिघाड जेव्हा होतात व त्याचे जेव्हा Root Cause Analysis होते. तेव्हा बहुतांश वेळेस आपण ठरवून दिलेल्या कामामध्ये केलेली दिरंगाई व कुचराईपणा निदर्शनास येतो. यासाठी आपली दैनंदिनी नियमितपणे केली पाहिजे.

माझ्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांचा निर्धार पाहिजे की, माझ्या कार्यक्षेत्रात उच्चप्रतीची उत्पादकता व दर्जा राहिला पाहिजे. त्यास कोणताही डाग लागता कामा नये. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आकस्मिक संकट, अपघात होता कामा नये, यासाठी

दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

सर्वांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण आदर्श पध्दतीचे काम केले पाहिजे.

हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, Sum Total of Individual Performance is Organization Performance करिता प्रत्येक अधिकारी व कर्मचारी कंपनीकरिता मौल्यवान ठरतो व त्याच्याकडून बजावण्यात येणाऱ्या कामगिरीवरून कंपनीच्या कामगिरीचे मूल्यमापन होत असते.

महापारेषण देशातील एक अग्रेसर पारेषण कंपनी आहे. त्याचा लौकिक सतत कायम राहावा, यासाठी आपण सर्व आदर्श भूमिका बजावत राहाल, याची मला खात्री आहे. कोरोना महामारीच्या काळात अखंड वीज राज्याला उपलब्ध करण्यात आपण पुढेही यशस्वी ठरू, याचा मला विश्वास आहे.

शुभेच्छांसह..!

– दिनेश वाघमारे
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

मुंबई : महानिर्मितीच्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्राव्दारे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी पर्यावरणमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्यासमवेत बैठक घेतली. त्याप्रसंगी वरिष्ठ अधिकारी.

शासन-प्रशासन

औष्णिक वीजप्रकल्पातून होणारे प्रदूषण कमी होणार

उत्सर्जित राखेचा वापर सिमेंट, रस्ते निर्मितीसाठी करणार : ऊर्जामंत्री

टीम महापारेषण/टीम महानिर्मिती, मुंबई

औष्णिक वीजप्रकल्पातून होणारे प्रदूषण कमी करून उत्सर्जित होणाऱ्या राखेचा वापर रस्ते बांधण्यासाठी व सिमेंट कारखान्यात करण्यासाठी राज्य शासनाचे धोरण तयार करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी मुंबई येथे ऊर्जा विभागाला दिले.

पॅरिस करारानुसार औद्योगिक कारणांमुळे होणारे पर्यावरणातील बदल टाळण्यासाठी महानिर्मितीच्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्राव्दारे होणारे प्रदूषण टाळणे आवश्यक आहे. त्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, म्हणून पर्यावरणमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्यासमवेत बैठक घेतली. या बैठकीला अनुसरून ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातून होणारे प्रदूषण टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन पर्यावरणमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांना यावेळी दिले.

उत्सर्जित राखेचा वापर रस्ते निर्माण करण्यासाठी व सिमेंट निर्मितीमध्ये करण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळ व सिमेंट उद्योग यांच्यासोबत लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. ऊर्जा मंत्रालयासोबत पर्यावरण मंत्रालयसुध्दा यात सहभागी होणार असल्याचे श्री. आदित्य ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

सध्या राज्यातील औष्णिक वीजप्रकल्पात वीज निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या कोळशाचा दर्जा चांगला नसल्याने यातून मोठ्या प्रमाणावर राख निर्मिती होते. त्याची विल्हेवाट लावण्यासाठी जर त्याचा वापर सिमेंट कारखान्यात व रस्ते बांधण्यासाठी केला तर पर्यावरणाचे संवर्धन करता येईल. मात्र, कोराडी व खापरखेडा येथील उत्सर्जित राखेचा वाहतूक खर्च अंदाजे १३५ कोटी रुपये असून सदर खर्च रस्ते विकास महामंडळाने उचलावा, अशी अपेक्षा डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच सिमेंट उद्योगांना याचा वापर करण्यास प्रोत्साहित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

औष्णिक वीजनिर्मिती केंद्रामुळे होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी करण्यात येणार आहे. राज्यातील वेस्टर्न कोल्ड फिल्ड्स लिमिटेडच्या (डब्लूसीएल) खाणीतील उच्च दर्जाच्या कोळशाची विक्री इतर राज्यांना करण्यात येते. मात्र, कमी दर्जाचा कोळसा महानिर्मितीच्या केंद्रांना देण्यात येत असल्याने यातून राख जास्त निर्माण होत आहे. लवकरच सर्व औष्णिक वीजनिर्मिती केंद्राची तपासणी करण्यात येणार असून त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाची माहिती घेतली जाईल, अशी माहिती डॉ. नितीन राऊत यांनी दिली.

प्रगतिपथावर असलेली कामे

जेजुरी-हिंजेवाडी दुहेरी परिपथ वाहिनी

मुंबई : हिंगोली जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती वर्षा गायकवाड व ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरण व महापारेषणमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांची महावितरणच्या फोर्ट येथील कार्यालयात बैठक पार पडली.

Work Review

विद्युत विकास कामाबाबत घेतला आढावा

हिंगोली जिल्ह्यातील कृषीपंपांना अखंडित वीजपुरवठा करा : ऊर्जामंत्री

टीम महापारेषण/टीम महावितरण, मुंबई

हिंगोली जिल्ह्यातील महावितरणच्या विविध योजनेतील सुरू असलेल्या विद्युत विकास कामांचा आढावा घेत शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी रोहित्रांची त्वरित पूर्तता करा, असे निर्देश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले.

हिंगोली जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती वर्षा गायकवाड व ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरण व महापारेषणमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांची महावितरणच्या फोर्ट येथील कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीत ऊर्जामंत्र्यांनी दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना, एकात्मिक ऊर्जा विकास योजना व उच्च दाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. वसमत तालुक्यातील आरळ व हिंगोली तालुक्यातील कानरखेडा येथील उपकेंद्राचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही केल्या.

शेतकऱ्यांना दर्जेदार व अखंडित वीज प्राप्त व्हावी, या दृष्टीने उच्च दाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले दापी, देऊळगाव रामा तसेच बाराशीव उपकेंद्र उभारण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी तसेच याबाबतचे नियोजन महावितरण व महापारेषणमधील अधिकाऱ्यांनी एकत्रितरित्या करून अंमलबजावणी करण्याचे निर्देशही ऊर्जामंत्र्यांनी दिले. पैनगंगा बॅरेजेसच्या विद्युतीकरणाचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या सहाय्याने तयार करून सादर करण्याच्या सूचनाही याप्रसंगी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिल्या.

हिंगोली जिल्ह्यातील उपलब्ध जलसाठा पुरेसा असल्याने कृषीपंपाची विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन नादुरुस्त रोहित्र दुरूस्त करून शेतकऱ्यांना त्वरित उपलब्ध करून द्यावेत. त्याचबरोबर वसमतचे आमदार श्री. राजूभैया नवघरे यांनी मागणी केल्यानुसार शेतकऱ्यांच्या सोयीसाठी वसमत येथे रोहित्र दुरुस्तीसाठी नवीन फिल्टर युनिट प्रस्तावित करण्याचे निर्देश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले.

दीनदयाळ योजनेअंतर्गत बसविण्यात आलेल्या रोहित्रांचे नादुरुस्तीचे प्रमाण खूप असून या रोहित्रांच्या गुणवत्तेची व संपूर्ण योजनेची चौकशी करणार असल्याची माहिती राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली.

यावेळी महावितरणचे संचालक (संचलन) श्री. दिनेश साबू, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे व इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

या बैठकीस खासदार श्री. राजीव सातव, आमदार श्री. राजूभैय्या नवघरे, औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. एन. बी. गीते, नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर तसेच हिंगोली मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. सुधाकर जाधव हे व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे उपस्थित होते.

प्रगतिपथावर असलेली कामे

बाळापूर-पारस वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांची ग्वाही

भोरमधील वीजवितरण यंत्रणा आणखी सक्षम करणार

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण, मुंबई*

भोर विधानसभा मतदारसंघातील (जि. पुणे) विजेचे विविध प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील. तसेच दुर्गम, अतिदुर्गम भागांसह इतर ठिकाणच्या वीज वितरण यंत्रणेचे जाळे आणखीन विस्तारित व सक्षम केले जाईल, अशी ग्वाही राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली.

मुंबई येथील महावितरणच्या मुख्यालयात भोर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्न, नवीन उपकेंद्र व वीज यंत्रणेचे सक्षमीकरण आदी मुद्द्यांवर बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी भोरचे आमदार श्री. संग्राम थोपटे, महावितरणचे संचालक श्री. दिनेश साबू, महापारेषणचे संचालक (संचलन), श्री. संजय ताकसांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भोर तालुक्यामध्ये वीजवाहिन्यांची लांबी जास्त असल्याने कमी दाबाच्या वीजपुरवठ्याची समस्या निर्माण झाली आहे. ती दूर करण्यासाठी नवीन वीज उपकेंद्र उभारणे, जीर्ण झालेले वीजखांब बदलणे आवश्यक आहे. याशिवाय अतिभारित रोहित्रांची क्षमता वाढ करण्यासोबतच मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनीला योजनेला गती देणे आदी मुद्द्यांव्र सविस्तर चर्चा करण्यात आली. यासंदर्भात तसेच विजेचे विविध प्रश्न

मार्गी लावण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात असे आदेश ऊर्जामंत्री डॉ. राऊत यांनी यावेळी दिले. तसेच प्रलंबित कृषीपंपांच्या नवीन वीजजोडण्या देण्याच्याही सूचना करण्यात आल्या.

सध्या महावितरणचा भोर उपविभाग हा बारामती परिमंडलाच्या कार्यक्षेत्रात आहे. मात्र, वीजग्राहकांच्या दृष्टीने गैरसोयीचे असल्याने भोर उपविभाग हा पुणे परिमंडलामध्ये समाविष्ट करावा, अशी मागणी आमदार श्री. संग्राम थोपटे यांनी केली. याबाबत अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे आदेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पुणे प्रादेशिक संचालकांना दिले.



या बैठकीला व्हिडीओ कॉन्फन्सिंगव्दारे प्रादेशिक संचालक, पुणे (प्रभारी) श्री. अंकुश नाळे, मुख्य अभियंता श्री. सुनील पावडे (बारामती), श्री. सचिन तालेवार (पुणे) आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महापारेषणच्या संचालकपदी (वित्त) श्री. अशोक फळणीकर रूजू

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या संचालकपदी (वित्त) श्री. अशोक आ. फळणीकर हे २१.०८.२०२० रोजी रूजू झाले. ते महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, संचालक संवर्गातील अधिकारी आहेत.

महापारेषणमध्ये रूजू होण्यापूर्वी श्री. फळणीकर हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई येथे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी म्हणून कार्यरत होते. तसेच त्यांनी यापूर्वी मा. मुंबई उच्च न्यायालय, मा. मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई विद्यापीठ आदी कार्यालयात सेवा केली आहे.

श्री. फळणीकर यांना वित्त व लेखाविषयक कामाचा महत्त्वाच्या पदांवर २५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा अनुभव आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठ येथून एम.कॉम. पदवी धारण केलेली आहे. त्यांनी वित्तीय सल्लागार आणि वित्तीय अधिकारी म्हणून विविध शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा महापारेषणला चांगला फायदा होणार आहे. महापारेषणच्या वतीने त्यांच्या पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा.

प्रगतिपथावर असलेली कामे

बाभळेश्वर-कोपरगाव वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

ऊर्जामंत्र्यांनी घेतला कामाचा आढावा

वीजचोरीला आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविणार : डॉ. नितीन राऊत

टीम महापारेषण/टीम महावितरण, मुंबई

वीज ही अत्यावश्यक सेवा आहे. राज्याच्या औद्योगिक व कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी राज्यात नवीन ऊर्जा धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या उच्चस्तरीय समितीच्या कामकाजाचा आढावा राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी घेतला.

मुंबईच्या फोर्टमधील वीज कंपनीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत वीजगळती थांबवून व खर्च कमी करून, शासनावर आर्थिक भार न लादता १०० युनिटपर्यंत ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबत, वीजवहन व निर्मिती याचा खर्च कसा कमी करता येईल, यावर सविस्तर चर्चा झाली. तसेच वीजगळती व वीजचोरी कमी करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल व याचा लाभ ग्राहकांना देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

राज्यात अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाची प्रामुख्याने

सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, महापारेषण कंपनीचा पारेषण खर्च कमी करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दैनंदिन खर्च कमी करणे या विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

वीजचोरी रोखण्यासाठी संबंधित ग्राहकाला पकडल्यावर त्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यासाठी गृहमंत्रालयासोबत चर्चा करून कमी वेळेत गुन्हा दाखल करण्यासाठी कायदा तयार करण्याबाबत चर्चा करण्यात येईल, असे डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी म्हटले.

तसेच कर्नाटक, आंध्रप्रदेश व राजस्थान या शेजारील राज्यातील सौरऊर्जा प्रकल्पांचा अभ्यास करून त्याचा अहवाल ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांना सादर करण्यात यावा, अशी सूचना डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी केली. समितीचे अध्यक्ष ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. असीमकुमार गुप्ता हे असून त्यांच्या अध्यक्षतेखाली महावितरण, महापारेषण व महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक तसेच महाऊर्जाचे महासंचालक हे या समितीचे सदस्य असून ऊर्जा विभागाचे उपसचिव, महापारेषणचे सेवानिवृत्त संचालक श्री. उत्तम झाल्टे, सेवानिवृत्त अति. व्यवस्थापक (भेल) श्री. रमाकांत मेश्राम, सेवानिवृत्त कार्यकारी संचालक (तांत्रिक) महावितरण श्री. अनिल खापर्डे हे निमंत्रित सदस्य आहेत.

सामाजिक कार्यात युनियनचा पुढाकार

तांत्रिक कामगार संघटनेच्या वर्धापनदिनी ६,६३० जणांचे रक्तदान

टीम महापारेषण, मुंबई

विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार संघटनेच्या ४३ व्या वर्धापनदिनानिमित्त राज्यात तिन्ही वीज कंपनीतील सभासदांकडून ६ हजार ६३० एवढे विक्रमी रक्तदान झाल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस श्री. आर. टी. देवकांत यांनी पत्रकाव्दारे दिली.

कोविड-१९ चे संकट असताना शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करून हा रक्तदान शिबिराचा सामाजिक उपक्रम तांत्रिक कामगार संघटनेकडून राबविण्यात आला. या शिबिरात स्वयंप्रेरणेने सोशल डिस्टन्सिंग राखत राज्यात ६ हजार ६३० जणांनी रक्तदान केले. कोरोना विरोधात लढाईसाठी कामगार संघटनेकडून २५०० पदाधिकाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन व १५ लाख १३ हजारांची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिली.

दरम्यान, रक्तदात्यांना टी-शर्ट, टीफिन, सॅनिटायझर, मास्क, पाण्याची बाटली, प्रमाणपत्र व शिल्ड भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सर्व रक्तदात्यांचे व पदाधिकाऱ्यांचे संघटनेचे अध्यक्ष सर्वश्री रवी बारई, उपाध्यक्ष गजानन सुपे, प्रवीण पाटील, उपसरचिटणीस नितीन पवार, उत्तम रोकडे, बाळासाहेब गायकवाड, राज्यसचिव हरिराम गिते, कोषाध्यक्ष संतोष घाडगे, राम चव्हाण यांनी अभिनंदन केले.

प्रगतिपथावर असलेली कामे

चाळीसगाव-पाचोरा वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

कार्यालयाच्या आवारात केले वृक्षारोपण

नागपूर परिमंडळात ७४ वा स्वातंत्र्यदिन साजरा

नागपूर : येथील अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळात स्वातंत्र्यदिनानिमित्त महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी मानवंदना देताना वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.

टीम महापारेषण, नागपूर

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे ७४ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

केंद्र व राज्य शासनाच्या अटी व नियमांचे पालन करून तसेच सोशल डिस्टन्सिंग राखत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते परिमंडळ कार्यालयाच्या आवारामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी मुख्य अभियंता (प्रभारी) तथा अधीक्षक अभियंता श्री. सतीश अणे, अधीक्षक अभियंता श्री. अविनाश निंबाळकर, श्री. संजय आत्राम, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश सावंत, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. पीयूष चिक्षे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) सौ. प्रणोती बुंदाले, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. पंजाब परचाके यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महापारेषणमध्ये ७४ वा स्वातंत्र्यदिन साधेपणाने साजरा

टीम महापारेषण, सांधिक कार्यालय, मुंबई

कोरोना विषाणू प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७४ वा स्वातंत्र्यदिन सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत साधेपणाने उत्साहात साजरा करण्यात आला. प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी महापारेषणचे कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागपूर : येथे अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळाच्या आवारात वृक्षारोपण करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. याप्रसंगी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.

मुंबई : महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीत ध्वजारोहणप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे. ध्वजारोहणप्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग.

मुंबई : राज्याचे ऊर्जा राज्यमंत्री श्री. प्राजक्त तनपुरे यांचा सत्कार करताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे. शेजारी कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे.

सुयश

भारतीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत श्री. मंदार पत्की देशात बावीसावा

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

येथील महापारेषणचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता श्री. जयंत पत्की यांचा मुलगा श्री. मंदार पत्की याने भारतीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात २२ वा क्रमांक पटकाविला. महाराष्ट्रात तो दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

श्री. मंदार पत्की याने बीड येथील संस्कार विद्यालयात शालांत परीक्षेत ९५ टक्के गुण मिळविले होते. शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथून ९२ टक्के गुण घेऊन पदविका प्राप्त केली होती. त्यानंतर व्ही.आय.टी. पुणे येथून बी.टेक (मेकॅनिकल) ची पदवी घेतली होती. अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच तो स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. पहिल्याच प्रयत्नात त्याने हे यश मिळविल्याने सर्वांनी त्याचे अभिनंदन केले आहे.



माझे कुटुंब माझी जबाबदारी

काळ वेळ विपरीत जरी
कोरोनाची धुसफुस दारी,
गड्या डरायचं नाय
कधी हारायचं नाय,
भर मनी तुडुंब ललकारी
माझे कुटुंब, माझी जबाबदारी...

चिल्ले-पिल्ले घरी
घरी वडीलधारी,
कामासाठी तू जरी दारी
काम असू दे, मन ठाम असू दे,
आदेश पाळ तू सरकारी
कारण,
माझे कुटुंब, माझी जबाबदारी...

चेह-यावर मास्क असलाच पाहिजे
चारचौघात मास्क लावलाच पाहिजे,
साबणाने हात धुतलेच पाहिजेत
स्वच्छतेशी नातं ठेवलंच पाहिजे,
आवर आता, सावर आता
भर रणी तुडुंब ललकारी
कारण,
माझे कुटुंब, माझी जबाबदारी...

– महेंद्र वाकळे



प्रगतिपथावर असलेली कामे

यवतमाळ-पांढरकवडा वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

अभ्यास (Study)

बरेच पालकवर्ग तक्रार करत असतात की, त्यांचा पाल्य अभ्यास करत नाही. त्यामुळे तो परीक्षेमध्ये कमी गुण मिळवितो. त्यासाठी प्रथम जाणून घेणे महत्त्वाचे आहे की, अभ्यास म्हणजे काय? अभ्यास म्हणजे आत्मसात करण्याची प्रक्रिया. या प्रक्रियेमध्ये चार महत्त्वाचे घटक असतात. १) वाचन २) आकलन ३) मनन ४) चिंतन हे चार घटक साध्य केल्यानंतर आत्मसात होण्याची प्रक्रिया पूर्ण होते व त्याला अभ्यास म्हणतात.

अभ्यास कशाचाही करावा लागतो. विद्यार्थिदशेत असताना आपण विविध विषयांचा अभ्यास करत असू. नोकरीमध्ये असताना आपण आपल्या कामाचा अभ्यास करतो. एखादा छंद जर आपणास असेल तर आपल्याला त्याचाही अभ्यास करावा लागतो. आत्मसात करण्याच्या कोणत्याही बाबीसाठी अभ्यास हा अनिवार्य ठरतो. जितका चांगला अभ्यास तितकाच आत्मसात करण्याची प्रक्रिया दर्जेदार. म्हणून अभ्यासाच्या या चार प्रक्रिया समजून घेणे महत्त्वाचे ठरते. प्रथम घटक म्हणजे वाचन. शुध्दलेखनाप्रमाणे वाचनसुध्दा शुध्द करता आले पाहिजे. वाचनामध्ये एकाग्रता आली पाहिजे. ध्यानसाधना व्यवस्थित असेल तर वाचन लवकर व गुणात्मक होते. वाचनाअंती किंवा समांतरित आकलन या व्दितीय घटकाची तयारीसुध्दा होते. त्यामध्ये आपली स्वतःची टिपण (Notes) काढणे, कठीण शब्द किंवा रचना समजून घेणे, शंका उपस्थित करणे व त्याचे निरसन करणे यांचा समावेश असतो.

या दोन पायऱ्या पार पाडल्यानंतर अभ्यासाचा अर्धा भार संपून जातो. नंतरचा अर्धा भार तिसरी व चौथी पायरी पूर्ण केल्यावर संपतो. मनन करणे म्हणजे आठवणीत ठेवणे किंवा पाठ करणे नव्हे! नाहीतर ती फक्त घोकंपट्टी ठरेल. वाचन व आकलनाच्या अंती पाठ करणे म्हणजे मनन. त्यामुळे मनन करण्याची प्रक्रिया सोपी होते. एकदा पाठ केल्यानंतर म्हणजे मनात ठेवल्यानंतर त्यावर सतत चिंतन करत राहणे. उदाहरणच द्यायचे झाले तर शालेय जीवनात ज्या पध्दतीने आपण पाढे पाठ करत असू त्यास चिंतन म्हणतात. हे अभ्यासाचे चारही घटक प्रामाणिकपणे मन लावून पार पाडले असता कोणतेही कठीण विषय आपल्याला आत्मसात करायला अडचण राहणार नाही. त्या विषयावर आपल्याला प्रभूत्व मिळविता येईल. वाचन, आकलन, मनन, चिंतन ही प्रक्रिया पार पाडल्यानंतर आपल्यामध्ये एक सहजता येते. त्यामुळे आपला आत्मविश्वास वाढीस लागतो.

जीवनात कोणतीही गोष्ट करताना अभ्यासाविना करू नका. स्वतःचा अभ्यास असेल तर आपणाकडून कोणतीही चूक होणार नाही. चिंतन तर यातली अशी बाब आहे की, की कधीही, कुठेही करू शकतो. ते करणे म्हणजे ध्यानधारणा (Meditation) करणे होय. रिकाम्या वेळी चिंतन करून आपण वेळेचा सदुपयोग करू शकतो.

वाचन, आकलन, मनन व चिंतन याची सवय लागली पाहिजे. यामध्ये कोणतीही पायरी सोडून चालणार नाही. अतिशय नेटकेपणाने आपला अभ्यास त्यातून होईल. कोणत्याही प्रश्नाला/शंकेला त्यामुळे आपल्याला उत्तर देता येईल. साहजिकच, त्याचा एक वेगळा आनंद व आत्मविश्वास आपल्या चेहऱ्यावर दिसेल. त्यामुळे आपले व्यक्तिमत्त्व सुधारण्यास मदत होईल. बहुतांश वेळा आपली गुणवत्ता आपल्या अभ्यासाच्या गुणवत्तेनुसार ठरत असते. जीवनात यशस्वी होणे सुध्दा अभ्यासावरच अवलंबून असते. यशस्वी व्यक्ती नेहमीच खूप अभ्यासू असते.

अभ्यासाला मर्यादा नाहीत. (Sky is the only Limit) अमर्याद आहे. जितका अभ्यास जास्त तितका त्याचा आनंद जास्त अर्थात निपुणताही जास्त येते.

शुभेच्छांसह..!

– सुगत गमरे
कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.